RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ६, अंक ५४(६)] बुधवार, जुलै १, २०२०/आषाढ १०, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १४०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जुलै २०२०

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक-१५२०प्र.क्र.-६४/कराधान-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही;

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकासह पोट-कलमे (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

१. या नियमांना महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (प्रथम सुधारणा) नियम, २०२० असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ च्या, नियम ६०क मध्ये, उप-नियम (४) मध्ये, "३० मार्च २०१९" या अंक आणि शब्दा ऐवजी "३१ मार्च २०२१" हे अंक आणि शब्द दाखल करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. वि. दिपटे,**
शासनाचे उप सचिव.